# संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ
## परिपत्रक

क्रमांक - संगाबाअवि/१/१०९/ ३-११३ /२०२०

दिनांक - ३ नोव्हेंबर, २०२०

**विषय - राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड-१९)चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय......**

संदर्भ -
१) शासन निर्णय क्र.संकिर्ण २०२०/प्र.क्र.१७८/विशि-३, दि.२१.९.२०२०
२) परिपत्रक क्र.संगाबाअवि/१/१०९/ १-६९४ /२०२०, दि.०३ ऑक्टोबर, २०२०
३) परिपत्रक क्र. संगाबाअवि/१/१०९/ १-६९५ /२०२०, दि. ०३ ऑक्टोबर, २०२०
४) निर्बंध शिथिल करणे व टाळेबंदी टप्प्याटप्प्याने उठविणे (पुनःश्च प्रारंभ अभियान) बाबत महाराष्ट्र शासन, महसुल व वने, आपत्ती व्यवस्थापन, राहत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे आदेश क्र.डीएमयु/२०२०/प्र.क्र.९२,डीआयएसएम-१, दि.१४ ऑक्टोबर, २०२०.
५) Easing of restrictions and phase-wise opening of Lockdown (MISSION BEGIN AGAIN) बाबत महाराष्ट्र शासन, महसुल व वने, आपत्ती व्यवस्थापन, राहत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे आदेश क्र. DMU/2020/CR.92,DisM-1, दि.२९ ऑक्टोबर, २०२०.

राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड-२०१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून उपरोक्त संदर्भ क्र.२ व ३ वरील परिपत्रकान्वये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभाग, विद्यापीठाचे मॉडेल डिग्री कॉलेज बुलढाणा तसेच विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये दि.३१ ऑक्टोबर, २०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत सूचना निर्गमित करण्यात आलेल्या होत्या.

तथापि, उपरोक्त संदर्भ क्र.५ अन्वये शासनाने कोरोना विषाणुचे देशभरातील वाढते संक्रमण रोखण्यासाठी तेवढ्याच तत्परतेने व तीव्रतेने खबरदारी घेणे व विविध प्रतिबंधात्मक उपायांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत निर्देशित केले असून टाळेबंदीचा कालावधी दि.३० नोव्हेंबर, २०२० पर्यंत वाढविण्यात आला आहे.

त्यानुषंगाने उपरोक्त संदर्भीय विद्यापीठ/ शासन परिपत्रक व शासन आदेशांच्या प्रती ह्या परिपत्रकासोबत जोडलेल्या असून त्याप्रमाणे विद्यापीठाचे सर्व प्रशासकीय व शैक्षणिक विभाग, मॉडेल डिग्री कॉलेज तसेच सर्व संलग्नित महाविद्यालयांनी आवश्यक ती कार्यवाही करावी.

आदेशान्वये-

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**प्रत माहिती करीता सविनय सादर-**
१) मा.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२.
२) मा.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
३) सहसंचालक (उ.शि.), अमरावती विभाग, अमरावती
४) सहसंचालक (तं.शि.), अमरावती विभाग, अमरावती.

**प्रतीलिपी माहिती तथा आवश्यक कार्यवाहीकरीता-**
१) सर्व शैक्षणिक विभाग प्रमुख/प्रशासकीय अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांना सूचित करण्यात येते की, उपरोक्त परिपत्रक त्यांच्या अधिनस्थ अधिकारी/कर्मचारी यांचे निदर्शनास आणून द्यावे व त्याचे काटेकोरपणे पालन करावे.
२) प्र.संचालक, मॉडेल डिग्री कॉलेज, बुलडाणा.
३) उपकुलसचिव (मवि), संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांना सूचित करण्यात येते की, सदर परिपत्रक सर्व संलग्नित महाविद्यालयांच्या निदर्शनास आणावे.

Rathod

उपकुलसचिव (प्रशा.)
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, संलग्नित महाविद्यालये, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे यामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यापुढे १०० टक्के उपस्थित राहण्याबाबत स्पष्टीकरणात्मक खुलासा.**

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

**शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण २०२०/प्र.क्र.१७८/विशि-३,**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,

दिनांक: २१ सप्टेंबर, २०२०.

**संदर्भः** शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक: संकीर्ण २०२०/प्र.क्र.१७८/विशि-३, दिनांक १८ सप्टेंबर, २०२०.

**प्रस्तावनाः-**

राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, संलग्नित महाविद्यालये, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे यामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यापुढे १०० टक्के उपस्थित राहण्याबाबत संदर्भाधीन दिनांक १८ सप्टेंबर, २०२० रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. याबाबत विविध शिक्षक व शिक्षकेतर संघटनांकडून निवेदने प्राप्त झाली आहेत. त्यामुळे याबाबत शासन स्तरावरुन स्पष्टीकरणात्मक खुलासा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः-**

उपरोक्त संदर्भाधीन दिनांक १८ सप्टेंबर, २०२० रोजीच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे स्पष्टीकरणात्मक खुलासा करण्यात येत आहेः-

(१) संदर्भाधीन दिनांक १८ सप्टेंबर, २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये परीक्षा व परीक्षेच्या कामाकाजाशी संबंधित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती आवश्यक असणार आहे. तथापि, सदर उपस्थिती ही ऑनलाईन किंवा प्रत्यक्ष, जशी शक्य आहे त्याप्रमाणे आवश्यकतेनुसार लागू राहिल.

(२) परीक्षा व परीक्षेशी संबंधित कामाकाजाचा खोळंबा होऊ नये म्हणून विद्यापीठे/ महाविद्यालयांनी उपस्थितीसंदर्भात आपल्या स्तरावर गरजेनुसार निर्णय घ्यावा. यासंदर्भात सर्व संबंधित विद्यापीठांनी/ शैक्षणिक संस्थांनी आवश्यक ती कार्यवाही त्वरीत करावी.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२००९२११७३५३५२६०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Pravinkumar Gulabrao Pawar

Digitally signed by Pravinkumar Gulabrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher and Technical Education, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8de261729f06eda4a56aba947eceb6140d7406426b2f08c9317bea2458ec1f92, serialNumber=8f18625adb482a7ee2512cea93ce697388c95a99c89e41e85c05a3de8476488f, cn=Pravinkumar Gulabrao Pawar
Date: 2020.09.21 17:38:13 +05'30'

**( प्रविणकुमार पवार )**

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रत-**

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
७) मा.अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) मा.सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई
९) मा.कुलगुरु, सर्व अकृषी विद्यापीठे
१०) मा.कुलगुरु, सर्व अभिमत विद्यापीठे
११) मा.कुलगुरु, सर्व स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे
१२) मा.कुलगुरु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड
१३) मा.कुलगुरु, कवि कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक, नागपूर
१४) मा.कुलगुरु, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
१५) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र, पुणे
१६) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र, मुंबई
१७) संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र, मुंबई
१८) निवडनस्ती (विशि-३).

# संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ
## परिपत्रक

क्रमांक - संगाबाअवि/१/१०९/ १-६९४ /२०२० दिनांक - ०३ ऑक्टोबर, २०२०

**विषय - राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड-१९)चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय......**

संदर्भ - १) परिपत्रक क्र.संगाबाअवि/१/१०९/ २-५५३/२०२०, दि. १ सप्टेंबर, २०२०
२) शासन निर्णय क्र.संकिर्ण २०२०/प्र.क्र.१७८/विशि-३, दि.२१.९.२०२०
३) Easing of restrictions and phase-wise opening of Lockdown (MISSION BEGIN AGAIN) बाबत महाराष्ट्र शासन, महसुल व वने, आपत्ती व्यवस्थापन, राहत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे आदेश क्र. DMU/2020/CR.92,DisM-1, दि.३० सप्टेंबर, २०२०.

राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड-२०१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून उपरोक्त संदर्भ क्र.१ च्या परिपत्रकान्वये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभाग, विद्यापीठाचे मॉडेल डिग्री कॉलेज बुलढाणा तसेच विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये दि.३० सप्टेंबर, २०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत सूचना निर्गमित करण्यात आलेल्या होत्या.

तथापि, उपरोक्त संदर्भ क्र.३ वरील शासन आदेशानुसार कोरोना विषाणुचे देशभरातील वाढते संक्रमण रोखण्यासाठी तेवढ्याच तत्परतेने व तीव्रतेने खबरदारी घेणे व विविध प्रतिबंधात्मक उपायांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत निर्देशित केले असून लॉकडाऊनचा कालावधी दि.३१ ऑक्टोबर, २०२० पर्यंत वाढविण्यात आला आहे. त्यानुषंगाने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभाग व विद्यापीठाचे मॉडेल डिग्री कॉलेज, बुलढाणा तसेच विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये, दि.३० सप्टेंबर, २०२० च्या पुढेही दि.३१ ऑक्टोबर, २०२० बंद राहतील.

तथापि लॉकडाऊनच्या कालावधीदरम्यान विद्यापीठातील कामकाज खाली निर्देशित केल्यानुसार सुरु राहील.

१) विद्यापीठातील संवैधानिक अधिकारी तसेच वर्ग १ व वर्ग २ मधील अधिकाऱ्यांची १०० टक्के उपस्थिती अनिवार्य आहे.

२) विद्यापीठामधील परीक्षा विभाग व सर्व शैक्षणिक विभागाच्या नियंत्रण अधिकाऱ्यांनी वर्ग १ व वर्ग २ मधील अधिकारी वगळता इतर कर्मचाऱ्यांना अत्यावश्यक कार्यालयीन कामकाजाकरीता बोलाविण्याबाबत उपरोक्त संदर्भ क्र.२ वरील शासन निर्णयानुसार कार्यवाही करावी.

३) या व्यतिरिक्त इतर प्रशासकीय विभागाच्या नियंत्रण अधिकाऱ्यांनी वर्ग १ व वर्ग २ मधील अधिकारी वगळता इतर कर्मचाऱ्यांना अत्यावश्यक कार्यालयीन कामकाजाकरीता उपरोक्त संदर्भ क्र. ३ मधील मार्गदर्शक सूचनेनुसार ३० टक्के किंवा ३० यापैकी जे जास्त आहेत त्याच्या अधीन राहून आळीपाळीने विभागामध्ये बोलवावे.

४) नियंत्रण अधिकारी यांनी दररोज आळीपाळीने विभागात कामाकरीता बोलाविण्यात येणार असलेल्या कर्मचाऱ्यांची यादी उपकुलसचिव (आस्था.) यांना न चुकता सादर करावी.

३) इतर शिक्षक, संशोधक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मुख्यालय न सोडता घरी राहून (Work form Home) संबंधित विभागाचे कामकाज करावे. मात्र त्यांना कार्यालयात बोलविल्यास त्यांना कार्यालयात त्वरीत हजर रहावे लागेल.

४) कार्यालयात कार्यरत असतांना संबंधितांनी तसेच विद्यापीठात येणाऱ्या अभ्यागतांनी कोव्हीड-१९ च्या संदर्भात घ्यावयाच्या काळजीबाबत विद्यापीठ प्रशासनाने दि.२८.५.२०२० रोजी इ-मेल द्वारे प्रसृत केलेल्या मार्गदर्शन सूचनांनी सर्व संबंधितांनी नोंद घेऊन काटेकोरपणे पालन करावे.

सर्व संबंधितांनी संदर्भ क्र.३ वरील शासन आदेशात नमूद सर्व बाबींचे तसेच सर्व जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशांचे/ सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

लॉकडाऊनच्या कालावधीत कार्यालयामध्ये काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांनी "आरोग्य सेतू" App वापरणे बंधनकारक असून याची जबाबदारी संबंधित विभाग प्रमुख/नियंत्रण अधिकारी यांची राहील.

अत्यावश्यक सेवा (आरोग्य केंद्र, सुरक्षा विभाग, अभियांत्रिकी विभाग पाणी पुरवठा, विद्युत पुरवठा, उद्यान विभाग व इतर सेवा) पुरविणाऱ्या प्रशासकीय विभाग प्रमुखांनी याबाबत त्यांचे स्तरावर योग्य ते नियोजन करावे.

आदेशान्वये-

कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**प्रत माहिती करीता सविनय सादर-**

१) मा.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२.

२) मा.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

३) सहसंचालक (उ.शि.), अमरावती विभाग, अमरावती

४) सहसंचालक (तं.शि.), अमरावती विभाग, अमरावती.

**प्रतीलिपी माहिती तथा आवश्यक कार्यवाहीकरीता**

१) सर्व शैक्षणिक विभाग प्रमुख/प्रशासकीय अधिकारी, संत.गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांना सूचित करण्यात येते की, उपरोक्त परिपत्रक त्यांच्या अधिनस्थ अधिकारी/कर्मचारी यांचे निदर्शनास आणून द्यावे व त्याचे काटेकोरपणे पालन करावे.

२) प्र.संचालक, मॉडेल डिग्री कॉलेज, बुलडाणा.

उपकुलसचिव (प्रशा.)
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

## संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ
## परिपत्रक

क्रमांक - संगाबाअवि/१/१०९/ १-६९५ /२०२०		दिनांक - ०३ ऑक्टोबर, २०२०

**विषय - राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड-१९)चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय......**

संदर्भ - १) परिपत्रक क्र.संगाबाअवि/१/१०९/ २-५५३/२०२०, दि. १ सप्टेंबर, २०२०
२) शासन निर्णय क्र.संकिर्ण २०२०/प्र.क्र.१७८/विशि-३, दि.२१.९.२०२०
३) Easing of restrictions and phase-wise opening of Lockdown (MISSION BEGIN AGAIN) बाबत महाराष्ट्र शासन, महसुल व वने, आपत्ती व्यवस्थापन, राहत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे आदेश क्र. DMU/2020/CR.92,DisM-1, दि.३० सप्टेंबर, २०२०.

राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड-२०१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून उपरोक्त संदर्भ क्र.१ च्या परिपत्रकान्वये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे मॉडेल डिग्री कॉलेज बुलढाणा तसेच विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये दि.३० सप्टेंबर, २०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत सूचना निर्गमित करण्यात आलेल्या होत्या.

तथापि, उपरोक्त संदर्भ क्र.३ वरील शासन आदेशानुसार कोरोना विषाणुचे देशभरातील वाढते संक्रमण रोखण्यासाठी तेवढ्याच तत्परतेने व तीव्रतेने खबरदारी घेणे व विविध प्रतिबंधात्मक उपायांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत निर्देशित केले असून लॉकडाऊनचा कालावधी दि.३१ ऑक्टोबर, २०२० पर्यंत वाढविण्यात आला आहे. त्यानुषंगाने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे मॉडेल डिग्री कॉलेज, बुलढाणा तसेच विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये, दि.३० सप्टेंबर, २०२० च्या पुढेही दि.३१ ऑक्टोबर, २०२० पर्यंत बंद राहतील.

तथापि लॉकडाऊनच्या कालावधीदरम्यान संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये व मॉडेल डिग्री कॉलेज, बुलडाणा ह्यांनी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीसंदर्भात संदर्भ क्र.२ वरील शासन निर्णयान्वये कार्यवाही करावी.

सर्व संबंधितांनी संदर्भ क्र.३ वरील शासन आदेशात नमूद सर्व बाबींचे तसेच सर्व जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशांचे/ सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

लॉकडाऊनच्या कालावधीत कार्यालयामध्ये काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांनी "आरोग्य सेतू" App वापरणे बंधनकारक असून याची जबाबदारी संबंधित विभाग प्रमुख/नियंत्रण अधिकारी यांची राहील.

आदेशान्वये-

कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**प्रत माहिती करीता सविनय सादर-**

१) मा.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२.
२) मा.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
३) सहसंचालक (उ.शि.), अमरावती विभाग, अमरावती
४) सहसंचालक (तं.शि.), अमरावती विभाग, अमरावती.

**प्रतीलिपी माहिती तथा आवश्यक कार्यवाहीकरीता**

१) प्र.संचालक, मॉडेल डिग्री कॉलेज, बुलडाणा.
२) उपकुलसचिव (मवि), संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांना सूचित करण्यात येते की, सदर परिपत्रक सर्व संलग्नित महाविद्यालयांच्या निदर्शनास आणावे.

उपकुलसचिव (प्रशा.)
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

202010231238301419

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.**
**क्रमांक: डीएमयु/२०२०/प्र. क्र.९२/डीआयएसएम -१, दिनांक १४ ऑक्टोबर, २०२०.**

**आदेश**

**निर्बंध शिथिल करणे व टाळेबंदी टप्प्याटप्प्याने उठवणे (पुनश्च प्रारंभ अभियान)**

**संदर्भ:**

१) साथरोग अधिनियम, १८९७.
२) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५.
३) महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग आदेश क्रमांक. डीएमयु२०२०/ सीआर ९२/डीएमयु -१, दिनांक २ मे २०२०, ३ मे २०२०, ५ मे २०२०, ११ मे २०२०, १५ मे २०२०, १७ मे २०२०, १९ मे २०२०, २१ मे २०२०, ३१ मे २०२०, ४ जून २०२०, २५ जून २०२०, २९ जून २०२०, ६ जुलै २०२०, ७ जुलै, २०२०, २९ जुलै २०२०, ४ ऑगस्ट २०२०, १९ ऑगस्ट २०२०, ३१ ऑगस्ट २०२० व ३० सप्टेंबर २०२०.
४) गृह मंत्रालय ( एमएचए) आदेश क्रमांक.४०-३/२०२०-डीएम-१(ए), दिनांक १ मे २०२०, ११ मे २०२०, १७ मे २०२०, २० मे २०२०, ३० मे २०२०, २९ जून २०२०, २९ जुलै २०२०, २९ ऑगस्ट २०२० व ३० सप्टेंबर २०२०.

**ज्याअर्थी,** आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ याअन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, खाली सही करणार, अध्यक्ष, राज्य कार्यकारी समिती यांनी, आपल्या अधिकारात, दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२० पर्यंत टाळेबंदी उपाययोजना वाढविण्यासाठी दिनांक ३० सप्टेंबर, २०२० चा आदेश काढला आहे आणि कोविड -१९ चा फैलाव होण्यास परिरोध (प्रतिबंध) करण्यासाठी वर नमूद केलेल्या आदेशांन्वये सुधारितपणे एकत्रित मार्गदर्शक तत्वे निर्गमित केलेली आहेत.

**ज्याअर्थी,** प्रतिबंधित प्रक्षेत्राबाहेर काही व्यवहार (कार्ये) पुन्हा सुरु करण्याबाबत राज्य शासनाची खात्री पटली आहे आणि ती सुरु करण्याबाबत शासनाचा विचार आहे.

**त्याअर्थी, आता,** साथरोग अधिनियम, १८९७ याच्या कलम २ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा आणि आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ याअन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, खाली सही करणार, अध्यक्ष, राज्य कार्यकारी समिती हे, आपल्या अधिकारात, याद्वारे, प्रतिबंधित प्रक्षेत्रांचे नियोजन व आरोग्यविषयक पायाभूत सुविधांची उपलब्धता या बाबी काळजीपुर्वक विचारात घेऊन, महाराष्ट्र राज्यातील सर्व विभागांच्या संबंधित प्राधिकरणांनी त्याची तात्काळ कोटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी दिनांक ३० सप्टेंबर, २०२० च्या मार्गदर्शक तत्वांच्या आदेशामध्ये यासोबत जोडलेल्या **जोडपत्र-दोन** मध्ये नमूद केलेले व्यवहार (कार्ये) समाविष्ट करण्याचे आदेश देत आहे.

असे निदेश देण्यात येत आहेत की, **जोडपत्र-एक** मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे कोविड-१९ च्या व्यवस्थापनाच्या राष्ट्रीय निदेशांचे, संपूर्ण राज्यभर अनुपालन करण्यात येईल. **जोडपत्र-दोन** मध्ये नमूद केल्याप्रमाणे व याआधीच मुभा दिलेले व वेळोवेळी परवानगी दिलेले व्यवहार नियमितपणे सूरू राहतील

आणि आधीचे सर्व आदेश, या आदेशाशी संलग्न असतील आणि ते, दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२० पर्यंत अंमलात राहतील. **पुनश्च प्रारंभ अभियानाअंतर्गत** शिथिलीकरणाबाबतचे पुढील आदेश यथावकाश अधिसूचित करण्यात येतील.

या उपाययोजना, राज्य शासनाने वेळोवेळी काढलेली मार्गदर्शक तत्त्वे किंवा मानक कार्य प्रणाली (एसओपी), इत्यादींचे उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ याच्या कलम ५१ ते ६० च्या तरतुदींनुसार तिच्याविरुध्द कार्यवाही केली जाण्यास पात्र असेल. याशिवाय भारतीय दंड संहितेच्या कलम १८८ अन्वये आणि लागू असलेल्या अन्य तरतुदींनुसार कायदेशीर कार्यवाही केली जाण्यास पात्र असेल. या दंडात्मक तरतुदींचे उतारे, **जोडपत्र-तीन** मध्ये दिलेले आहेत.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**(संजय कुमार)**
**मुख्य सचिव,**
**महाराष्ट्र शासन.**

प्रत:

१) माननीय महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे प्रधान सचिव, मुंबई.
२) माननीय सभापती, महाराष्ट्र विधान परिषद.
३) माननीय अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा.
४) माननीय अध्यक्ष, रेल्वे मंडळ, रेल भवन, नवी दिल्ली.
५) माननीय मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव, महाराष्ट्र.
६) मुख्य महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई
७) मुख्य महाव्यवस्थापक, पश्चिम रेल्वे, चर्चगेट, मुंबई.
८) माननीय उपमुख्यमंत्री यांचे सचिव, महाराष्ट्र.
९) माननीय विरोधी पक्षनेता, विधान परिषद /विधानसभा यांचे खाजगी सचिव.
१०) सर्व माननीय मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय.
११) महाराष्ट्र शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव.
१२) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१३) प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय.
१४) सचिव, वैद्यकीय शिक्षण, मंत्रालय.
१५) राज्यातील सर्व विभागीय आयुक्त.
१६) राज्यातील सर्व पोलीस आयुक्त.
१७) राज्यातील सर्व महानगरपालिका आयुक्त.
१८) सर्व जिल्हाधिकारी.
१९) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
२०) राज्यातील सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक.

जोडपत्र- एक

[पुनश्च प्रारंभ अभियान: महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२, आदेश क्रमांक: डीएमयु/२०२०/प्र.क्र.९२/डीआयएसएम-१, दि.१४ ऑक्टोबर, २०२०]

## कोविड-१९ च्या व्यवस्थापनाबाबतचे राष्ट्रीय निदेश

१) **चेहरा झाकणे**- सार्वजनिक ठिकाणी, कामाच्या ठिकाणी व प्रवास करताना, चेहरा झाकणे अनिवार्य आहे.

२) **सामाजिक अंतर राखणे**- सार्वजनिक ठिकाणी, सर्व व्यक्तींनी कमीत कमी ६ फूट ( दो *गज की दूरी*) इतके अंतर राखले पाहिजे.

दुकानदार, ग्राहकांमध्ये शारीरिक अंतर राखण्याची सुनिश्चिती करतील आणि एकावेळी पाचपेक्षा अधिक व्यक्तींना मुभा देणार नाहीत.

३) **एकत्र जमणे** - मोठी सार्वजनिक संमेलने/ भव्य सभा यांस नियमितपणे मनाई असेल.
विवाह संबंधित कार्यक्रमात एकत्र जमणे- पाहुण्यांची कमाल संख्या ५० पेक्षा अधिक असणार नाही.
अंत्यसंस्कार/अंत्यविधी यासंबंधातील कार्यक्रमात एकत्र जमणे- व्यक्तींची संख्या २० पेक्षा अधिक असणार नाही.

४) **सार्वजनिक ठिकाणी थुंकणे** हे, संबंधित स्थानिक प्राधिकरणांद्वारे, त्यांचे कायदे, नियम, विनियम यांनुसार विहित करण्यात येईल अशा दंडाच्या शिक्षेस पात्र असेल.

५) सार्वजनिक ठिकाणी **मद्यपान, पान, गुटखा, तंबाखू, इत्यादींच्या सेवनास** मनाई आहे.

### कामाच्या ठिकाणांबाबतचे अतिरिक्त निदेश:

६) **घरातून काम करणे**- शक्य असेल तेथवर, घरून काम करण्याची पद्धत अनुसरण्यात यावी. कार्यालये, कामाची ठिकाणे, दुकाने, बाजारपेठा आणि औद्योगिक व वाणिज्यिक आस्थापना यांमध्ये कामाच्या/कामकाजाच्या वेळांची सुनियोजितपणे आखणी करावी.

७) **परिक्षण (स्क्रीनिंग) व स्वास्थ्य**- औष्णिक परीक्षण (थर्मल स्कॅनिंग), हात स्वच्छ करण्याचे द्रव्य (हँडवॉश) व निर्जंतुकीकरण द्रव्य (सॅनिटायझर) हे सर्व प्रवेशद्वाराजवळ व निर्गमन द्वाराजवळ आणि सामाईक क्षेत्रांत पुरविण्यात येईल.

८) **वारंवार निर्जंतुकीकरण (सॅनिटायझेशन)**- संपूर्ण कामाच्या ठिकाणाचे, सामाईक सुविधांचे व मानवी संपर्कात येणा-या सर्व जागा यांचे, उदाहरणार्थ दरवाजांच्या मुठी (डोअर हॅण्डल), इत्यादींचे कामाच्या पाळयांमध्ये वारंवार निर्जंतुकीकरण (सॅनिटायझेशन) करण्याची सुनिश्चिती करण्यात येईल.

९) **सामाजिक अंतर राखणे**- कामाच्या ठिकाणांच्या सर्व प्रभारी व्यक्ती, कामगारांमध्ये पुरेसे अंतर राखणे, कामाच्या पाळयांदरम्यान पर्याप्त अंतर ठेवणे, कर्मचा-यांच्या दुपारच्या जेवणाच्या वेळेत पुरेसे अंतर राखणे, इत्यादींद्वारे सामाजिक अंतर राखण्याची सुनिश्चिती करतील.

**********

जोडपत्र-दोन

[पुनश्च प्रारंभ अभियान: महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२, आदेश क्रमांक: डीएमयु/२०२०/प्र.क्र.९२/डीआयएसएम-१, दि. १४ ऑक्टोबर, २०२०]

१) परिरोधन (प्रतिबंधित) प्रक्षेत्रे :-

एक. शासन आदेश दि.१९ मे, २०२० व दि.२१ मे, २०२० अन्वये वर्गीकृत केल्याप्रमाणे, राज्यातील प्रतिबंधित प्रक्षेत्रे (झोन) ही पुढील आदेशांपर्यंत अंमलात असतील.

दोन. परिरोधन (प्रतिबंधित) प्रक्षेत्रे सीमांकित करण्यासाठी केंद्र शासन व राज्य शासनाने वेळोवेळी दिलेले निर्देश व त्यांचे कार्यान्वयन पुढील आदेशांपर्यंत अंमलात राहतील.

तीन. स्थानिक परिस्थिती विचारात घेता, राज्यातील संबंधित जिल्हाधिकारी व महानगरपालिकांचे आयुक्त, साथीचा प्रादुर्भाव होण्यास परिरोध (प्रतिबंध) करण्यासाठी बिगर अत्यावश्यक कार्यांस आणि व्यक्तींच्या येण्या-जाण्यास परवानगी दिलेल्या विवक्षित स्थानिक क्षेत्रांमध्ये, मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या लेखी पुर्वपरवानगीनेच केवळ विवक्षित उपाययोजना व आवश्यक निर्बंध अंमलात आणू शकतील.

२) या आदेशापूर्वी, उघडण्यास मुभा दिलेली सर्व अत्यावश्यक सेवा दुकाने, नियमितपणे सुरू राहतील.

३) यापूर्वी वेळोवेळी मुभा दिलेले व परवानगी दिलेले व्यवहार (कार्ये) नियमितपणे सुरू राहतील व आधीचे सर्व आदेश, या आदेशाशी संलग्न असतील आणि ते, ३१ ऑक्टोबर, २०२० पर्यंत अंमलात राहतील.

**४) प्रतिबंधित प्रक्षेत्रांच्या बाहेर पुढील व्यवहार (कार्ये) सुरु करण्यास मुभा देण्यात येईल.**

प्रतिबंधित प्रक्षेत्राच्या बाहेरील क्षेत्रांमध्ये पुढील कार्यांखेराज, सर्व व्यवहारांना (कार्यांस) परवानगी असेल:-

एक. गृह मंत्रालयाने परवानगी दिली असेल त्याव्यतिरिक्त, आंतरराष्ट्रीय हवाई प्रवासी वाहतूक.

दोन. शाळा, महाविद्यालये, शैक्षणिक व शिकवणी (कोचींग) संस्था, विद्यार्थ्यांसाठी व नियमित वर्ग व्यवहारांसाठी दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२० पर्यंत बंद राहतील.

क) ऑनलाईन / दूरस्थ शिक्षण यांस परवानगी असेल आणि त्यास प्रोत्साहन दिले जाईल.

ख) १५ ऑक्टोबर, २०२० पासून प्रतिबंधित प्रक्षेत्रांबाहेरील क्षेत्रांमध्येच केवळ ऑनलाईन अध्यापन / दुरसमुपदेशन यांकरीता आणि तत्संबंधित कामकाजासाठी शाळांमध्ये एका वेळी ५० टक्कयांपर्यंत शिक्षक व अध्यापनेतर कर्मचारीवर्ग यांना बोलाविण्यास परवानगी देण्यात येईल. यासाठी आरोग्य व सुरक्षा विषयक खबरदारी घेण्यासंबंधीची मानक कार्य प्रणाली (एसओपी) शालेय शिक्षण

विभागाद्वारे निर्गमित करण्यात येईल. आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय आणि शालेय शिक्षण व साक्षरता विभाग, शिक्षण मंत्रालय, भारत सरकार यांनी निर्गमित केलेली मानक कार्यप्रणाली (एसओपी) शालेय शिक्षण विभागाकडून विचारात घेण्यात येईल.

**तीन.** राष्ट्रीय कौशल्य प्रशिक्षण संस्थांमध्ये, औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये (आय.टी.आय), राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ किंवा राज्य कौशल्य विकास अभियान किंवा भारत सरकार अथवा महाराष्ट्र शासन यांची इतर मंत्रालये यांकडे नोंदणी केलेली अल्पमुदतीची प्रशिक्षण केंद्रे यांमध्ये कौशल्य किंवा उद्योजकता प्रशिक्षणास परवानगी असेल.

राष्ट्रीय उद्योजकता व लघु व्यवसाय विकास संस्था (एन.आय.ई.एस.बी.यु.डी), भारतीय उद्योजकता संस्था (आय.आय.ई) आणि त्यांचे प्रशिक्षण पुरवठादार यांना देखील परवानगी असेल.

वरील गोष्टींना दि.१५ ऑक्टोबर, २०२० पासून परवानगी देण्यात येईल. आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने निर्गमित केलेली मानक कार्यप्रणाली (एसओपी) अनुसरण्यात येईल.

**चार.** उच्च शिक्षण संस्थांमधील, ऑनलाईन / दुरस्थ शिक्षण अध्यापन पध्दतीस प्राधान्य देण्यात येईल आणि त्यास प्रोत्साहन दिले जाईल. तथापि, उच्च शिक्षण संस्थांमध्ये केवळ विज्ञान व तंत्रज्ञान शाखेतील संशोधक (पी.एच.डी) व पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असणा-या प्रयोगशाळा / प्रायोगिक कामे खालीलप्रमाणे दि.१५ ऑक्टोबर, २०२० पासून उघडण्याची परवानगी असेल:-

क) केंद्रीय अर्थसहाय्यित उच्च शिक्षण संस्थांच्या बाबतीत, विज्ञान व तंत्रज्ञान शाखेतील संशोधक (पी.एच.डी) व पदव्युत्तर विद्यार्थ्यांची प्रयोगशाळा / प्रायोगिक कामांसाठी खरी गरज असल्याची संस्था प्रमुखांची स्वत:ची खात्री झाल्यानंतरच

ख) सर्व इतर उच्च शिक्षण संस्थांच्या बाबतीत उदा. राज्य विद्यापीठे, खाजगी विद्यापीठे, इत्यादींच्या बाबतीत, केवळ विज्ञान व तंत्रज्ञान शाखेतील संशोधकांना (पी.एच.डी) व पदव्युत्तर विद्यार्थ्यांनाच आवश्यक असणा-या प्रयोगशाळा / प्रायोगिक कामांसाठी उघडता येतील.

जिल्ह्यातील कोविड-१९ ची परिस्थिती व घटना विचारात घेऊन, त्याआधारे, गृह मंत्रालयाशी विचारविनिमय करुन उच्च शिक्षण विभागाकडून यास परवानगी देण्यात येईल. त्याच्या कामकाजाची मानक कार्य प्रधाली (एसओपी) उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून निर्गमित करण्यात येईल.

**पाच.** सामाजिक अंतर व स्वच्छता याबाबतीतील कोविड-१९ च्या मार्गदर्शक सूचनांचे अनुसरण करुन सर्व शासकीय व खाजगी ग्रंथालये दि.१५ ऑक्टोबर, २०२० पासून सुरु करण्यास परवानगी दिली जाईल. त्याच्या कामकाजाची मानक कार्य प्रणाली (एसओपी) उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून निर्गमित करण्यात येईल.

**सहा.** दि.१५ ऑक्टोबर, २०२० पासून टप्प्याटप्प्याने मेट्रो रेल्वे सुरु करण्याकरीता परवानगी देण्यात येईल. त्याची मानक कार्य प्रणाली (एसओपी) नगर विकास विभागाकडून निर्गमित करण्यात येईल. नगर

विकास विभागाकडून त्यासाठी गृहनिर्माण व नागरी कार्य मंत्रालयाकडून निर्गमित करण्यात आलेली मानक कार्य प्रणाली (एसओपी) विचारात घेण्यात येईल.

**सात.** विवाह, इतर खाजगी कौटुंबिक कार्यक्रम आणि त्यासारख्या कार्यक्रमांमध्ये, ५० पेक्षा जास्त नसतील इतके पाहुणे आणि अंत्यासंस्कार / अंत्य विधी यांना २० पेक्षा जास्त नसतील इतक्या व्यक्तिंना उपस्थित राहण्यास परवानगी असणे सुरु राहील.

**आठ.** बगिचे, उद्याने व शारिरीक व्यायामांच्या प्रयोजनांसाठी सार्वजनिक खुल्या जागा उघडण्यास परवानगी असणे सुरु राहील.

**नऊ.** दि.१५ ऑक्टोबर, २०२० पासून केवळ प्रतिबंधित प्रक्षेत्राबाहेरील क्षेत्रांमध्ये, व्यापार ते व्यापार (बी२बी) प्रदर्शने सुरु करण्यास परवानगी असेल. त्याची मानक कार्य प्रणाली (एसओपी) उद्योग विभागाकडून निर्गमित करण्यात येईल. उद्योग विभागाकडून भारत सरकारच्या वाणिज्य विभागाने निर्गमित केलेली मानक कार्य प्रणाली (एसओपी) विचारात घेण्यात येईल.

**दहा.** दि.१५ ऑक्टोबर, २०२० पासून केवळ प्रतिबंधित प्रक्षेत्राबाहेरील क्षेत्रांमध्ये स्थानिक आठवडी बाजार (प्राण्यांच्या बाजारांसह) सुरु करण्यास परवानगी देण्यात येईल. त्याची मानक कार्य प्रणाली (एसओपी) संबंधित ग्रामीण / नागरी स्थानिक संस्थांकडून निर्गमित करण्यात येईल आणि तेथे कोविड-१९ च्या संबंधातील सर्व मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात येईल.

५. गर्दी नियंत्रित / कमी करण्याच्या उद्देशाने दि.१५ ऑक्टोबर, २०२० पासून प्रतिबंधित प्रक्षेत्रांच्या बाहेरील क्षेत्रांतील बाजार / दुकाने अधिकचे दोन तास सुरु ठेवण्यास परवानगी असेल आणि ती सकाळी ९ ते रात्री ९ वाजे पर्यंत सुरु राहतील.

६. वेगवेगळ्या विमानतळांवर येणा-या देशांतर्गत प्रवाशांची कोविड लक्षणांची तपासणी करण्यात येईल. पक्क्या शाईचा शिक्का मारण्याची कार्यपध्दती तात्काळ बंद करण्यात येईल.

७. महाराष्ट्र राज्यात रेल्वे गाड्यांनी येणा-या प्रवाशांची रेल्वे स्थानकात आरोग्य तपासणी करणे व त्यांना शाईचा शिक्का मारण्याची कार्यपध्दती बंद करण्यात येईल. तथापि, या प्रवाशांनी, सामाजिक अंतर व स्वच्छता या बाबतीतीतल कोविड-१९ च्या सर्व मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे.

८. कोणत्याही विशेष/सर्वसाधारण आदेशाद्वारे मुभा दिलेले व परवानगी दिलेले इतर कोणतेही कार्य नियमितपणे सुरू ठेवता येईल.

९. साथरोगाच्या प्रसारास प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने वरील व्यवहारांखेरीज अन्य कोणत्याही व्यवहारांस, केवळ मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या पुर्व लेखी मान्यतेनेच परवानगी देण्यात येईल.

१०. **राज्यभर प्रतिबंधित केलेले निर्बंध शिथिल करणे व व्यवहार सुरु करण्याबाबतची कार्यवाही टप्प्या टप्प्याने आवश्यक त्या मानक कार्यप्रणाली / मार्गदर्शक सूचनांसह यथावकाश करण्यात येईल.**

****************

जोडपत्र-तीन

**[महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२, आदेश क्रमांक: डीएमयु/२०२०/प्र.क्र.९२/डी आय एस एम-१, दिनांक १४ ऑक्टोबर, २०२०]**

**टाळेबंदी उपाययोजनांचे उल्लंघन केल्याबद्दल अपराध व शास्ती**

**अ. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ ची कलमे ५१ ते ६०**

**५१. अडथळा,इत्यादी आणण्याबद्दल शिक्षा.-**

जो कोणी, वाजवी कारणाशिवाय,-

(क) केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्याला किंवा कर्मचाऱ्याला अथवा राष्ट्रीय प्राधिकरणाने किंवा राज्य प्राधिकरणाने किंवा जिल्हा प्राधिकरणाने प्राधिकृत केलेल्या एखाद्या व्यक्तीला या अधिनियमान्वये त्यांची कार्ये पार पाडण्यास अडथळा आणील; किंवा

(ख) केंद्र सरकार किंवा राज्य शासन किंवा राष्ट्रीय कार्यकारी समिती किंवा राज्य कार्यकारी समिती किंवा जिल्हा कार्यकारी समिती यांनी किंवा त्यांच्या वतीने, या अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही निदेशाचे अनुपालन करण्यास नकार देईल,-

तो, दोषसिद्धी झाल्यावर, एक वर्षापर्यंत वाढविता येईल इतक्या कारावासाच्या किंवा द्रव्यदंडाच्या किंवा दोन्ही शिक्षास पात्र ठरेल, आणि जर असा अडथळा आणल्यामुळे अथवा निदेशांचे अनुपालन करण्यास नकार दिल्यामुळे जीवित हानी झाली किंवा त्यामुळे जीवितास गंभीर धोका निर्माण झाला असेल तर, दोष सिद्ध झाल्यावर दोन वर्षांपर्यंत वाढविता येईल इतक्या कारावासाच्या शिक्षेस पात्र ठरेल.

**५२. खोट्या दाव्याबद्दल शिक्षा:**

जो कोणी, केंद्र सरकार, राज्य शासन, राष्ट्रीय प्राधिकरण, राज्य प्राधिकरण किंवा जिल्हा प्राधिकरण यांच्या कोणत्याही अधिकाऱ्याकडून आपत्तीच्या परिणामी मिळणारी कोणतीही मदत, सहाय्य, करण्यात येणारी दुरूस्ती, पुनर्रचना अथवा अन्य लाभ मिळविण्यासाठी हेतुपुरस्सर असा दावा करील की, जो खोटा असल्याचे त्यास माहीत असेल वा तसे समजण्यास कारण असेल तर तो, दोष सिद्ध झाल्यावर, दोन वर्षापर्यंत वाढविता येईल इतक्या कारावासाच्या शिक्षेस आणि द्रव्यदंडास देखील पात्र ठरेल.

**५३. पैशाचा किंवा साहित्य, इत्यादीचा दुर्विनियोग केल्याबद्दल शिक्षा:**

कोणत्याही इशारादर्शक आपत्तीच्या परिस्थितीत अथवा आपत्तीच्या काळात सहाय्य करण्याच्या प्रयोजनार्थ असलेला कोणताही पैसा वा साहित्य ज्याच्याकडे सोपविण्यात आलेले असेल किंवा अन्यथा ज्याच्या कब्जात असेल किंवा अशा पैशावर वा साहित्यावर ज्याची सत्ता असेल असा जो कोणी, अशा पैशाचा व साहित्याचा अथवा त्याच्या कोणत्याही भागाचा दुर्विनियोग करील किंवा स्वत:साठी विनियोग करील किंवा विल्हेवाट लावील किंवा बुद्धिपुरस्सरपणे अन्य कोणत्याही व्यक्तीस तसे करण्यास भाग

पाडील, तो दोष सिद्ध झाल्यावर, दोन वर्षापर्यंत वाढविता येईल इतक्या कारावासाच्या शिक्षेस आणि द्रव्यदंडास देखील पात्र ठरेल.

**५४. खोटी पूर्वसूचना दिल्याबद्दल शिक्षा.-**

जो कोणी, आपत्तीसंदर्भात अथवा तिच्या तीव्रतेबाबत वा परिणामाबद्दल ज्यामुळे घबराट निर्माण होईल, अशाप्रकारे खोटा धोक्याचा इशारा किंवा पूर्वसूचना देईल वा प्रसारित करील तो, दोष सिद्ध झाल्यावर, एक वर्षापर्यंत वाढविता येईल इतक्या कारावासाच्या शिक्षेस किंवा द्रव्यदंडास पात्र ठरेल.

**५५. शासकीय विभागांनी केलेले अपराध.-**

(१) जेव्हा या अधिनियमाखालील अपराध शासनाच्या कोणत्याही विभागाने केलेला असेल त्याबाबतीत अशा अपराधासाठी विभाग प्रमुखास, दोषी मानण्यात येईल आणि असा अपराध, त्याच्या नकळत घडला होता किंवा असा अपराध घडू नये म्हणून त्याने सर्व प्रकारची दक्षता घेतली होती असे त्याने सिद्ध न केल्यास, त्यानुसार खटला भरण्यास व शिक्षेस तो पात्र असेल.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा या अधिनियमाखालील अपराध शासनाच्या कोणत्याही विभागाने केलेला असेल आणि असा अपराध विभाग प्रमुखाखेरीज, अन्य अधिकाऱ्याच्या संमतीने किंवा त्याने दुर्लक्ष केल्यामुळे किंवा त्याच्या कोणत्याही निष्काळजीपणामुळे घडून आला असल्याचे सिद्ध झाले असेल त्याबाबतीत, असा अधिकारी, त्याअपराधासाठी दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार खटला भरण्यास व शिक्षेस तो पात्र असेल.

**५६. अधिकाऱ्याने कर्तव्यात कसूर करणे किंवा या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्याकडे त्याने दुर्लक्ष करणे.-**

ज्या अधिकाऱ्यावर या अधिनियमाद्वारे किंवा त्यान्वये कोणतेही कर्तव्य लादण्यात आले असेल आणि जो त्याचे पदीय कर्तव्य पार पाडणे बंद करील किंवा पार पाडण्यास नकार देईल किंवा अशा पदीय कर्तव्यापासून स्वतःला दूर ठेवेल असा कोणताही अधिकारी त्याच्या कार्यालयीन वरिष्ठांकडून सुस्पष्ट लेखी परवानगी मिळाली नसेल तर किंवा तसे करण्यास त्याला इतर कायदेशीर कारण नसेल तर तो, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा द्रव्यदंडास पात्र असेल.

**५७. अधिग्रहणाशी संबंधित असणाऱ्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन केल्याबाबत शास्ती.-**

जर कोणत्याही व्यक्तीने कलम ६५ अन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन केले तर, ती व्यक्ती, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षेस पात्र असेल.

**५८. कंपन्यांनी केलेला अपराध.-**

(१) जेव्हा या अधिनियमाखालील अपराध एखाद्या कंपनीने किंवा निगम निकायाने केला असेल त्याबाबतीत अपराध केला त्या वेळी, कंपनीचे कामकाज चालविण्याकरिता जी व्यक्ती, कंपनीची प्रभारी होती किंवा त्यास जबाबदार होती अशी प्रत्येक व्यक्ती, त्याचप्रमाणे, कंपनी, अशा उल्लंघनासाठी दोषी

असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार तिच्याविरुद्ध खटला भरण्यास आणि त्यानुसार होणाऱ्या शिक्षेस ती पात्र असेल:

परंतु असे की, जर त्या व्यक्तीने, असा अपराध तिच्या नकळत घडला होता किंवा असा अपराध घडू नये म्हणून तिने योग्य ती दक्षता घेतली होती हे सिद्ध केले तर, या पोट कलमातील कोणतीही गोष्ट या अधिनियमान्वये तरतूद केलेल्या कोणत्याही शिक्षेस अशा कोणत्याही व्यक्तीस पात्र ठरविणार नाही.

(२) पोटकलम(१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा या अधिनियमाखालील अपराध, एखाद्या कंपनीने केलेला असेल, आणि असा अपराध कोणत्याही संचालकाच्या, व्यवस्थापकाच्या, सचिवाच्या किंवा कंपनीच्या अन्य कोणत्याही अधिकाऱ्याच्या संमतीने, किंवा त्याने दुर्लक्ष केल्यामुळे किंवा त्यांच्या कोणत्याही निष्काळजीपणामुळे घडून आला असल्याचे सिद्ध झाले असेल त्याबाबतीत, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी, त्या अपराधासाठी दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार त्याच्याविरुद्ध खटला भरण्यास व शिक्षेस पात्र असेल.

**स्पष्टीकरण.** - या कलमाच्या प्रयोजनार्थ,--

(क) "कंपनी" याचा अर्थ, कोणतेही निगम निकाय, असा आहे आणि त्यात भागीदारी संस्थेचा किंवा अन्य व्यक्ती संघाचा समावेश होतो; आणि

(ख) भागीदारी संस्थेच्या संबंधात, "संचालक" याचा अर्थ, भागीदारी संस्थेतील एखादा भागीदार, असा आहे.

## ५९. खटला भरण्यासाठी पूर्व मंजुरी.-

केंद्र सरकारची किंवा राज्य शासनाची, किंवा, यथास्थिति, अशा सरकारच्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे याबाबतीत प्राधिकृत केलेल्या अन्य कोणत्याही अधिकाऱ्याची पूर्व मंजुरी घेतल्याखेरीज, कलम ५५ व ५६ खालील शिक्षेस पात्र असलेल्या अपराधासाठी कोणताही खटला भरण्यात येणार नाही.

## ६०.अपराधांची दखल.-

(क) राष्ट्रीय प्राधिकरणाने, राज्य प्राधिकरणाने, केंद्र सरकारने, राज्य शासनाने, जिल्हा प्राधिकरणाने किंवा अन्य कोणत्याही प्राधिकरणाने किंवा त्या प्राधिकरणाने किंवा यथास्थिति, सरकारने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने; किंवा

(ख) राष्ट्रीय प्राधिकरणाकडे, राज्य प्राधिकरणाकडे, केंद्र सरकारकडे, राज्य शासनाकडे, जिल्हा प्राधिकरणाकडे किंवा इतर कोणत्याही प्राधिकरणाकडे किंवा उपरोक्तप्रमाणे प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडे, जिने अभिकथित अपराधाबाबत विहित रीतीने तीस दिवसांपेक्षा कमी नसेल इतक्या दिवसांची नोटीस दिली असेल आणि तक्रार करण्याचा जिचा हेतू असेल अशा कोणत्याही व्यक्तीने,

केलेल्या तक्रारी खेरीज, कोणतेही न्यायालय, या अधिनियमाखालील अपराधांची दखल घेणार नाही.

**ब. भारतीय दंड संहिता, १८६० यामधील कलम १८८**

**१८८. लोक सेवकाने रीतसर जारी केलेल्या आदेशाची अवज्ञा.-**

एखादा आदेश जारी करण्यास कायदेशीरपणे अधिकार प्रदान झालेल्या लोक सेवकाने जारी केलेल्या अशा आदेशाद्वारे, विवक्षित कृती करण्यापासून परावृत्त राहण्याचा अथवा स्वतःच्या कब्जातील किंवा स्वतःच्या व्यवस्थापनाखालील विवक्षित मालमत्तेबाबत विवक्षित बंदोबस्त करण्याचा आपणांस निदेश मिळाला आहे हे माहीत असून जो कोणी अशा आदेशाची अवज्ञा करील त्याला,_

जर कायदेशीरपणे नियुक्त झालेल्या एखाद्या व्यक्तीला अशा अवज्ञेमुळे अटकाव, त्रास किंवा क्षती झाली अथवा अटकाव, त्रास किंवा क्षती यांचा धोका उत्पन्न झाला अथवा ते होण्याकडे त्या अवज्ञेचा रोख असेल तर, एक महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या साध्या कारावासाची, किंवा दोनशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील;

आणि जर अशा अवज्ञेमुळे मानवी जीवित, आरोग्य, किंवा सुरक्षितता यांना धोका पोचला किंवा पोचण्याकडे तिचा रोख असेल अथवा तीमुळे दंगा किंवा दंगल घडून आली किंवा घडून येण्याकडे तिचा रोख असेल तर, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारावासाची, किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, किंवा दोन्ही शिक्षा होतील.

**स्पष्टीकरण.-** अपाय घडवून आणणे अपराध्याला उद्देशित असले पाहिजे किंवा आपण अवज्ञा केल्याने अपाय घडणे संभवनीय आहे याची त्याला पूर्वकल्पना असली पाहिजे अशी आवश्यकता नाही. तो ज्याची अवज्ञा करतो त्या आदेशाची त्याला माहिती होती, आणि त्याच्या अवज्ञेमुळे अपाय घडला किंवा घडणे संभवनीय आहे, एवढे पुरेसे आहे.

**उदाहरण:**

एका विशिष्ट रस्त्यावरून धार्मिक मिरवणूक जाता कामा नये असा आदेश जारी करण्यास कायदेशीरपणे अधिकार प्रदान झालेल्या लोक सेवकाने असा आदेश जारी केला आहे. 'क' जाणीवपूर्वक त्या आदेशाची अवज्ञा करतो, आणि त्यामुळे दंग्याचा धोका उत्पन्न होतो. 'क' ने या कलमात व्याख्या करण्यात आलेला अपराध केला आहे.

**********

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**Department of Revenue and Forest, Disaster Management,**
**Relief and Rehabilitation, Mantralaya, Mumbai- 400 032**
**No: DMU/2020/CR. 92/DisM-1, Dated: 29th October, 2020**

# ORDER

**Easing of Restrictions and Phase-wise opening of Lockdown. (MISSION BEGIN AGAIN)**

---

**Reference:**

1) The Epidemic Diseases Act, 1897.
2) The Disaster Management Act, 2005
3) Revenue and Forest. Disaster Management. Relief and Rehabilitation Department Order No. DMU-2020/C.R.92/DMU-I, dated 2nd May 2020, 3rd May 2020, 5th May 2020, 11th May 2020, 15th May 2020, 17th May 2020, 19th May 2020, 21st May 2020, 31 May 2020, 4th June 2020, 25th June 2020, 29th June 2020, 6th July 2020, 7th July 2020, 29th July 2020, 4th August 2020, 19th August 2020, 31st August 2020, 30th September, 2020 and 14th October 2020.
4) Ministry of Home Affairs (MHA) Order No. 40-3/2020-PM-1 (A) Dated 1st May 2020, 11th May 2020, 17th May 2020, 20th May 2020, 30th May 2020, 29th June 2020, 29th July 2020, 29th August 2020, 30th September 2020 and 27th October 2020.

Whereas, in exercise of the powers, conferred under the Disaster Management Act 2005, the undersigned, in his capacity as Chairperson, State Executive Committee has issued an Order dated 30th September, 2020 to extend the lockdown measures up to 31st October, 2020 and issued revised consolidated guidelines from time to time vide above mentioned orders to contain the spread of COVID-19.

Whereas, in exercise of the powers conferred under Section 2 of the Epidemic Diseases Act, 1897 and the powers, conferred under The Disaster Management Act, 2005, the undersigned, in his capacity as Chairperson, State Executive Committee, has vide Order dated 14th October, 2020 included certain activities mentioned in Annexure II of the guidelines Order dated 30th September, 2020

Whereas the State Government is satisfied that the State of Maharashtra is threatened with the spread of COVID-19 virus, and therefore to take certain emergency measures to prevent and contain the spread of virus, the Government in exercise of the powers conferred under Section 2 of the Epidemic Diseases Act, 1897, read with all other enabling provisions

of The Disaster Management Act, 2005, it is expedient to extend the lockdown in the entire State of Maharashtra further till midnight of 30th November, 2020.

Now, therefore, in exercise of the powers conferred under Section 2 of the Epidemic Diseases Act, 1897 and the powers, conferred under The Disaster Management Act, 2005, the undersigned, in his capacity as Chairperson, State Executive Committee, hereby issues directions that the guidelines issued vide orders dated 30th September, 2020 and 14th October, 2020 to operationalize MISSION BEGIN AGAIN for easing of restrictions and phase-wise opening, will remain in force till 30th November, 2020 for containment of COVID-19 epidemic in the State and all Departments of Government of Maharashtra shall strictly implement these guidelines. The activities already allowed and permitted from time to time shall be continued and all earlier orders shall be aligned with this order and shall remain in force up to 30th November, 2020.

BY ORDER AND IN THE NAME OF THE GOVERNOR OF MAHARASHTRA

(SANJAY KUMAR)
CHIEF SECRETARY
GOVERNMENT OF MAHARASHTRA

**Copy to** :

1. Principal Secretary to Hon'ble Governor of Maharashtra, Mumbai.
2. Hon'ble Chairman, Maharashtra Legislative Council.
3. Hon'ble Speaker, Maharashtra Legislative Assembly.
4. Additional Chief Secretary to Hon'ble Chief Minister, Government of Maharashtra.
5. Principal Secretary to Hon'ble Chief Minister, Government of Maharashtra,
6. Secretary to Hon'ble Deputy Chief Minister, Government of Maharashtra,
7. Private Secretary to Leader of Opposition, Legislative Council / Assembly,
8. Private Secretaries of All Hon'ble Minister/Minister of State, Mantralaya,
9. All Additional Chief Secretaries / Principal Secretaries / Secretaries of Government of Maharashtra.
10. Director General of Police, Maharashtra State, Mumbai,
11. Principal Secretary, Public Health Department, Mantralaya,
12. Secretary, Medical Education, Mantralaya,
13. All Divisional Commissioners in the State
14. All Commissioners of Police in the State
15. All Commissioners of Municipal Corporations in the State
16. All District Collectors
17. All Chief Executive Officers, Zilla Parishad
18. All District Superintendents of Police in the State